असा. क्र. २८ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**शुक्रवार, जुलै २७, २००७/श्रावण ५, शके १९२९**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

### अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.**—मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम . . . . . . . . | २३६-२३७ |

दिनांक २७ जुलै २००७ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " दिनांक २७ जुलै २००७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ व महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांमध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, २००७ चा महा. अध्या. ४. त्यांनी दिनांक १२ जून २००७ रोजी मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००७, हा प्रख्यापित केला होता ;





**[किंमत : रुपये ९.००]**

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

(२) तो, दिनांक १२ जून २००७ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

प्रकरण दोन

**मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ यामध्ये सुधारणा**

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १०-१क ची सुधारणा.

**२.** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ याच्या कलम १०-१क मध्ये,— १९५९ चा मुंबई ३.

(एक) पहिल्या परंतुकामधील, खंड (दोन) मध्ये "तीन महिन्यांच्या मुदतीत" या मजकुराऐवजी "चार महिन्यांच्या मुदतीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये "तीन महिन्यांच्या मुदतीत" या मजकुराऐवजी "चार महिन्यांच्या मुदतीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण तीन

**महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यामध्ये सुधारणा**

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ याच्या कलम १२क ची सुधारणा.

**३.** महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१, याच्या कलम १२क मध्ये,— १९६२ चा महा. ५.

(एक) पहिल्या परंतुकामधील, खंड (दोन) मध्ये "तीन महिन्यांच्या मुदतीत" या मजकुराऐवजी "चार महिन्यांच्या मुदतीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) दुसऱ्या परंतुकामध्ये "तीन महिन्यांच्या मुदतीत" या मजकुराऐवजी "चार महिन्यांच्या मुदतीत" हा मजकूर दाखल करण्यात येईल.

प्रकरण चार

**संकीर्ण**

सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) मुंबई ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) अध्यादेश, २००७ हा, याद्वारे, निरसित करण्यात येत आहे. २००७ चा महा. अध्या. ४.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ किंवा, यथास्थिति, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ यांअन्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या संबंधित अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये करण्यात आलेली गोष्ट किंवा कारवाई असल्याचे मानण्यात येईल. १९५९ चा मुंबई ३. १९६२ चा महा. ५.

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई